सं.फौ.ख.क्र.२००६/२०२३.
सरकार/कमल आंभोरे
नि.क्र.१३ चा पुढील भाग

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१ अर्चना आलोक पांडे यांचा पुरावा शपथेवर पुढे सुरुः–
उलटतपास आरोपीतर्फे वकील श्रीमती अर्चना सोनारे यांचे मार्फत सूरुः–

०८. माझ्याकडे सुद्धा पाळीव कुत्रा आहे. मी तो सन–२०२१ पासुन पाळलेला आहे. माझ्याकडे लॅब्रा जातीचा कुत्रा आहे. मला माझ्या कुत्र्याबद्दल लगाव आहे. मी लॅब्रा प्रजातीचा कुत्रा पाळण्याचे कुठलेही विशिष्ठ कारण नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, मला सदर कुत्रा आवडला म्हणुन पाळला. आमच्या इंम्पेरिअल ग्रॅन्डच्या परिसरामध्ये जवळपास २०० ते २५० कार असतात व १०० ते १५० मोटरसायकल असतात. हे मी सांगु शकत नाही की, आमच्या संपुर्ण कॉलोनीमध्ये ४०० ते ५०० लोक राहतात किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या कॉलोनीमध्ये जवळपास सर्वांकडेच पाळीव कुत्रे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या कॉलोनीमधील ४० ते ५० लोकांकडे पाळीव कुत्रे आहेत. ज्यांच्याकडे पाळीव कुत्रे आहेत, ते सर्वच लोक त्यांचे कुत्रे बाहेर फिरवायला आणतात. जसे मी माझ्या पाळीव कुत्र्याला पट्टयाने बांधुन फिरवते, तसेच इतर लोकही त्यांच्या कुत्र्याला पट्टयाने बांधुन फिरवतात. हे मला माहिती नाही की, आरोपी सुद्धा त्यांच्या कुत्र्यांना पट्टयाने बांधुन फिरवतात. माझ्या घराची व आरोपीच्या घराची कंपाउंड वॉल एकच आहे. जेव्हा पासुन आरोपी आमच्या सोसायटीमध्ये राहायला आली, तेव्हापासुन तिच्याकडे पाळीव कुत्रे असल्याचे मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी आरोपी व तिचा मुलगा त्यांच्या पाळीव कुत्र्यांना फिरवत होते. हे मला माहिती नाही की, ते सदर कुत्रे पट्टयाने बांधुन फिरवत होते किंवा कसे. माझ्या म्हणण्याप्रमाणे घटना ही सकाळी ९:२६ ते ९:३० च्या सुमारास घडली. तथाकथीत घटनेच्या दिवशी मी सुद्धा माझ्या कुत्र्याला बाहेर फिरविण्यासाठी घेवुन गेले होते. तेव्हा माझ्या सोबत सेफ्टी स्टीक सोबत नव्हती. जेव्हा मी माझा कुत्रा बाहेर फिरविण्यासाठी काढला होता, तेव्हा आरोपी ही तिच्या दोन्ही मुत्रयांसह मेन गल्लीमध्ये होती. हे म्हणणे खरे नाही की, जेव्हा मी माझ्या कुत्र्याला घेवुन बाहेर आली, तेव्हा माझा कुत्रा आरोपीच्या कुत्र्यांवर भूंकला होता.

प्रश्नः– तुम्ही हजर केलेल्या सिसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये घटनेची वेळ १०:२५ ते १०:३८ अशी दाखविण्यात आली आहे?

उत्तरः– घरातील सिसीटीव्ही फुटेजमध्ये ९:३० ची योग्य वेळ दाखविण्यात आली आहे व बाहेरील फुटेज हे कॉम्प्यूटरला जोडलेले असल्यामुळे त्यामध्ये कॉम्प्यूटर मध्ये असलेली वेळ दाखविण्यात आली आहे.

०९. सदर स्पष्टीकरण मी पोलीसांना सांगीतले नव्हते. सिसीटीव्ही फूटेज हे माझ्या

पतीने पोलीसांना कॉम्प्यूटर मधुन काढुन दिले होते. आमचे व आरोपीचे सर्वसामान्य शेजा–यांसारखे संबंध होते. माझा कुत्रा व आरोपीचे कुत्रे एकत्र खेळत नाही. मी आरोपीच्या घरी कधीही गेले नाही, कारण मला गरज पडली नाही. घटनेच्या पुर्वी सुद्धा आरोपीचे कुत्रे हे माझ–या मुलीच्या अंगावर, माझ–या कुत्र्याच्या अंगावर हल्ला करण्याकरीता आले होते, हे मी पोलीसांना जवाब देतांना सांगीतले होते, परंतु सदर बाब माझ–या जवाबात नमुद नाही, त्याचे कारण मला सांगता येणार नाही. मी पुर्वीच्या घटनेच्या वेळेस कोणत्याही अधिका–याकडे तक्रार केली नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, ते माझे शेजारी असल्यामुळे आम्ही तक्रार केली नाही.

१०. मी पोलीसांना सांगीतले होते की, ''तेव्हा आरोपी ही तिच्या दोन्ही कुत्र्यांसोबत आमच्या घरासमोरील कॉलोनीच्या गल्लीमध्ये उभी होती'' सदर बाब माझ–या जवाबात का नमुद नाही, त्याचे कारण मी सांगु शकत नाही. तसेच मी पोलीसांना जवाब देतांना सांगीतले होते की, ''तेव्हा आरोपीचा दुसरा कुत्रा माझ–या अंगावरुन उडी मारुन माझ–या घरामध्ये डायनींग टेबल पर्यंत माझ–या कुत्र्यामागे गेला होता'', परंतु सदर बाब माझ–या जवाबात का नमुद नाही, त्याचे कारण मला सांगता येणार नाही. मी पोलीसांना जवाब देतांना आरोपीच्या ''मोठया कुत्र्याने माझ–या डाव्या पायाचे मांस तोडले'', असे सांगीतले होते, परंतु माझ–या जवाबात ''मास तोडले'' हा शब्द का नमुद नाही, त्याचे कारण मला सांगता येणार नाही. तसेच मी पोलीसांना जवाब देतांना सांगीतले होते की, माझ–या डाव्या पायावर १७ टाके लागले'' परंतु सदर बाब माझ–या जवाबात का नमुद नाही, त्याचे कारण मला सांगता येणार नाही. मी पोलीसांना दिलेला जवाब वाचुन पाहिला होता. हे मला माहिती नाही, आरोपी ही चंद्रपुर येथे नौकरीला आहे. हे मला माहिती नाही की, आरोपी ही जेव्हा ही बाहेर गावी जाते, तेव्हा तिचे कुत्रे सोबत घेवुन जाते. माझा पाळीव कुत्रा हा मेल आहे. सर्वसामान्यपणे सर्वच लोक आपआपल्या कुत्र्यांना बाहेर फिरविण्याकरीता आणतात. आमच्या कॉलोनीच्या मेनगेटला सेक्यूरीटी गार्ड असतात. आमच्या कॉलोनीमध्ये काही विदेशी लोक राहतात. सदर विदेशी लोक डेसॉल्ट कंपनीमध्ये काम करतात.

मध्यांतराची वेळ झाल्यामुळे साक्षीदाराचा उलट तपास तहकुब

वा.दा.ब.अ.क. केले.

माझे समक्ष,

VISHAL HARIBHAU KHEDKAR
Digitally signed by VISHAL HARIBHAU KHEDKAR
Date: 2026.04.07 16:57:40 +0530

(व्ही.एच.खेडकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
हिंगणा.

हिंगणा.
दि.०७.०४.२०२६

मध्यांतराच्या सुट्टीनंतर अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.०१ अर्चना आलोक पांडे यांचा उलटतपास आरोपीतर्फे वकील श्रीमती अर्चना सोनारे यांचे मार्फत शपथेवर पुढे सूरुः-

११. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या कुत्र्याला पंट्टा बांधुन बाहेर निघाले, तेवढयातच आरोपीच्या हातातुन तिच्या कुत्र्यांचे पट्टे सुटले. हे मला माहिती नाही की, आरोपीच्या कुत्र्यांना कोणत्या कलरचे पट्टे बांधलेले होते. हे मी सांगु शकत नाही की, आरोपीचे कुत्रे हे माझ्या कुत्र्याला पाहुनच सुटले. हे मला माहिती नाही की, सर्वसाधारणपणे एक कुत्रा दुसऱ्या कुत्र्याला पाहुन त्याच्या जवळ जातो. घटनेनंतर आरोपी लगेच तेथे आली व तिने मला सहानुभुती दिली. घटनेनंतर पहिले आरोपी आली व नंतर माझा ड्रायव्हर आला व त्यानंतर थोडयावेळाने आरोपीचा मुलगा आला. माझ्या डायव्हरने निळया रंगाची टिशर्ट घातली होती. हे मला माहिती नाही की, तेव्हा माझा ड्रायव्हर कोठे उभा होता. हे म्हणणे खरे नाही की, पहीले आरोपीच्या हातुन एका कुत्र्याचा व नंतर आरोपीच्या मुलाच्या हातुन दुसऱ्या कुत्र्याचा पट्टा सुटल्यामुळे आरोपीचा मुलगा हा सुद्धा घटनास्थळावर लगेच आला.

१२. मी व आरोपी कधीच एकत्र एखाद्या कार्यक्रमाला गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझ्या कुत्र्यांचा कलर सारखाच असल्यामुळे मला निश्चीत कोणाच्या कुत्र्याने चावा घेतला, हे सिसीटीव्ही फुटेज मध्ये दिसुन येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी ही एक महिला असल्यामुळे सर्वप्रथम ती माझ्याकडे आली व त्यानंतर तिचा मुलगा आला. हे म्हणणे खरे नाही की, घटनेनंतर सिसीटीव्ही मध्ये आरोपी ही एकच कुत्रा वापस घेवुन जातांना दिसत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला दवाखन्यात नेण्याकरीता म्हटले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपीने दवाखन्याचा खर्च देण्याचे सुद्धा म्हटले होते. हे मला आठवत नाही की, त्यावेळेस आरोपीने काय म्हटले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळेस मी गोंधळलेली असल्यामुळे तेव्हा काय घडले, हे मला आठवत नाही. आमच्या कॉलोनी पासुन पोलीस स्टेशनचे अंतर आठ ते दहा किलोमिटर अंतरावर आहे. आम्हाला कॉलोनी पासुन पोलीस स्टेशनला जाण्याकरीता १५ ते २० मिनीट लागतात. माझ्याकडे दोन चारचाकी वाहन व दोन दूचाकी वाहन आहेत. माझ्या गाडीला ड्रायव्हर आहे. माझे पदवी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. मी तक्रार घटनेच्या २४ तासानंतर दिली. मी पोलीसांना विलंबाचे कारण सांगीतले होते. हे मला माहिती आहे की, फोन केल्यानंतर पोलीस येतात.

प्रश्नः- तुम्हाला ऑनलाईन पद्धतीने तक्रार दिल्या जाते, याबाबतची माहिती होती का?

उत्तरः- मी जिवन-मरणाच्या परिस्थीतीमध्ये असल्यामुळे सर्वप्रथम दवाखन्यात गेली.

१३. माझ्या कामाची वेळ ९ ते ७ आहे. मी मिटींग प्रमाणे घरुन कामाकरीता निघते. माझे व आरोपीचे मागच्या वर्षी एकवेळेस बोलणे झाले होते, ती त्याची निश्चीत तारीख सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे व आरोपीचे संबंध खराब असल्यामुळे व आरोपीची कुठलीही चुक नसतांना मी सिसीटीव्ही फूटेज पाहुन आरोपीविरुद्ध खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.

फेर तपास नाही.

वा.दा.ब.अ.क. केले.

माझे समक्ष,

VISHAL HARIBHAU KHEDKAR

Digitally signed by VISHAL HARIBHAU KHEDKAR
Date: 2026.04.07 16:57:49 +0530

हिंगणा.
दि.०७.०४.२०२६

(व्ही.एच.खेडकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
हिंगणा.